International Referred Research Journal, January, 2012, ISSN- 0975-3486, RNI : RAJBIL 2009/30097, VOL- III * ISSUE 28

शोध पत्र- शिक्षा

January 2012

# गांधीजी आणि सत्याग्रह

* डॉ. गोकर्णा कृष्णचंद्र मानक

* सहयोगी प्राध्यापक शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला ( महाराष्ट्र )

राष्ट्रपिता मोहनदास करमचंद गांधी यांचा जन्म २ ऑक्टोंबर १८६९ रोजी गुजरातमधील पोरबंदर या ठिकाणी झाला. वैष्णव पंथाचे संस्कार त्यांच्या मनावर अगदी बालपणापासून झाले. त्यांचे बालपण पोरबंदरातच गेले. पुढे त्यांच्या बंधूनी त्यांना शिक्षणार्थ परदेशी पाठवले. विलायतेत त्यांची गाठ दोन थिऑसॉफिस्ट मित्रांशी पडली. त्यांचा सहवास गांधीजींच्या जीवनाला नवी दिशा दाखविण्यास कारणीभूत झाला. त्यांच्या प्रेरणेने गांधी गीताध्ययनास प्रवृत्त झाले. गांधीनी स्वतः:च यासंबंधी म्हटले आहे की, भगवत्‌गीता हा अमूल्य ग्रंथ आहे, अशी माझी त्यावेळी समजूत झाली ती समजूत हळूहळू दृढ होत गेली व आज तत्वज्ञानाच्या बाबतीत मी तिला सर्वोत्तम ग्रंथ समजतो. त्यातच त्यांच्या मित्रांनी बुध्दचरित्राशीही गांधीचा परिचय करुन दिला. एका ख्रिस्ती मित्राच्या सौजन्याने बायबलच्या अंतरंगात त्यांना शिरता आले. या अनेक धर्मग्रंथांच्या समन्वयानेच गांधीच्या भावी जीवनाची तात्विक पायाभरणी झाली आणि पुढे सत्याग्रहाच्या त्यांच्या प्रयोगाला लागणारी साधनसामुग्री गोळा झाली. विलायतेतील वास्तव्याची दुसरी एक जमेची बाजू म्हणजे कायद्याची पद्धवी त्यांनी पदरात पाडून घेतली. पुढे विश्वस्त कल्पनेला जन्म देतांना आणि दक्षिण आफ्रिकेत चंचुप्रवेश मिळवितांना हे भांडवल त्यांना उपयोगी पडले.

काठियावाडला काही दिवस वकिली केली पण तिदाल्या वातावरणाला ते लवकरच विटले. इतक्यात पोरबंदरच्या एका मेमण पेढीतर्फे दक्षिण आफ्रिकेतील दावा चालविण्यासाठी जाण्याची संधी त्यांना मिळाली. गांधीच्या जीवनाला महत्वाचे वळण देणारी ही त्यांची दुसरी परदेशयात्रा ठरली. तिथे टॉलस्टॉय, रस्किन आणि दोरो यांच्या विचारवैभवाशी त्यांचा जवळून परिचय झाला. त्यांच्या जीवनावर या त्रयींच्या विचाराचा खोल ठसा उमटला व तो पुढे जन्मभर टिकला. त्यांनी रस्किनच्या "अन् टु धीस लास्ट" नामक पुस्तकाचे गुजराती भाषांतर "सर्वोदय" या नावाने केले. ते म्हणतात सर्वोदयाचे सिध्दांत मी समजतो ते असे

१) सर्वांच्या कल्याणात आपले कल्याण आहे.

२) वकील काय किंवा हजाम काय, दोघांच्या कामाची किंमत सारखीच असली पाहिजे कारण पोटापाण्याचा हक्क दोघांनाही सारखाच आहे.

३) साधे, अंगमेहनतीचे, शेतकऱ्याचे जीवन हेच खरे जीवन होय.

गांधीजींच्या मते, सत्याग्रह हा प्रत्यक्ष कृतीचा सर्वात प्रभावी मार्ग आहे. त्यामुळे इतर सर्व मार्ग दाकल्यानंतरच याचा अवलंब केला जावा असे ते म्हणतात. "दुराचाराचाही मुकाबला सदाचाराने करावा" हे गांधी विचाराचे अंत:सूत्र होते. सत्याग्रह हे आत्मिक सामर्थ्य असून येशू ख्रिस्त, डॅनियल, सॉक्रेटीस हे त्यांचे मूर्तिमंत आविष्कार आहेत.

सत्याग्रहाचे पहिले तत्व म्हणजे, सत्याचा शोध करायचा झाल्यास विरोधकाशी वागतांना हिसेंचा अवलंब करता कामा नये. तर धीर धरुन व सहानुभूती दाखवून त्याला चुकीपासून परावृत्त केले पाहिजे. जी गोष्ट एकाला सत्य वाटते ती दुसऱ्याला चुकीची वाटू शकते आणि धीर धरणे म्हणजे आत्मक्लेश सहन करणे. म्हणून सत्याग्रहाच्या तंत्रात विरोधकाला त्रास देणे बसत नाही. त्याचा भर स्वतः क्लेश सोसण्यावर असतो. सत्य आणि अहिंसा या दोहोच्या मिलाफातून संपूर्ण जगाला नतमस्तक करता येऊ शकते. हा सत्याग्रहामागील मूल विचार आहे. राजकीय व राष्ट्रीय जीवनात सत्य व सौजन्य यांचा आविष्कार करणे म्हणजे सत्याग्रह. हा आग्रह निष्क्रिय नसतो. सक्रीय प्रतिकार हा या चळवळीचा आत्मा आहे. पण तो प्रतिकार हिंसाचारात सक्रीय होत नाही, तर प्रेम, विश्वास आणि त्याग या स्वरुपात सक्रीय होत असतो. आणि शक्तींची ही त्रिवेणी सत्याग्रह संज्ञेत अभिव्यक्त होत असते. गांधीची सत्याग्रह कल्पना ही एक अभिनव कल्पना असून पश्चिमेतील सामाजिक-राजकीय विचारात तिला तोड सापडणार नाही. किंबहुना असे म्हटले तरी अतिशयोक्ती होऊ नये की, "सत्याग्रह संकल्पना" ही गांधीजींनी विश्वविचाराला दिलेली अभिजात देणगी आहे. परकीय राजवटीतून मुक्ती मिळविण्यासाठी त्यांनी तिला घडवली असली तरी जगातील अनेक राष्ट्रात भिन्न स्वरुपाच्या समस्या सोडविण्यासाठी व अन्याय निवारण्यासाठी तिचा अवलंब केला गेला.

सत्याग्रहाच्या रुपाने सामूहिक कृतीचा एक मार्ग गांधीजीनी दाखविला आहे. मार्क्सच्या सामूहिक कृतीपेक्षा गांधीजींनी अभिप्रेत असलेली सामूहिक कृती वेगळी आहे. मार्क्सप्रमाणे त्यांची कृती ही विशिष्ट वर्गाची नाही. गांधीजींच्या सत्याग्रहाचे दुसरे वैशिष्ट असे की, विचारांचे कृतीशी अव्दैत गांधी मानतात. जोपर्यंत विचारात अहिंसा मुरत नाही तोपर्यंत कृतीत अहिंसेचे सातत्य फार काळ टिकवून ठेवणे अशक्य असते. गांधीजींचा सत्याग्रह म्हणजे झुंडशाही नाही. झुंडशाहीमध्ये व्यक्तिच्या आपल्या नेहमीच्या नैतिक पातळीपासून अध: पतन होत असते. एरव्ही ज्या गोष्टी करायची व्यक्तीला लाज वाटते. त्या गोष्टी ती झुंडीत बेदरकारपणे करते. याउलट सत्याग्रहात घडते. व्यक्तीचा नैतिक स्तर नेहमीपेक्षा उंचावतो. शब्दपेक्षा कृती परिणामांच्या दृष्टीने अधिक प्रभावी असते हेही सत्याग्रहामागील एक गृहीत आहे. एवंगुण वैशिष्ट्यांनी अलंकृत असलेला सत्याग्रह, गांधीसाठी जीवनाचे शास्त्र आहे. त्याचप्रमाणे जीवनाची कलाही आहे. आपणच त्याचे निर्माते असल्याचे गांधीनी म्हटले आहे.

सत्याग्रहाच्या यशस्वी उपयोगाकरिता पहिली आवश्यक गोष्ट म्हणजे शरीराहून निराळे असे आत्म्याचे अस्तित्व मान्य असायला

पाहिजे. आत्मा शरीरापेक्षा चिरंतन आणि श्रेष्ठ आहे ही श्रध्दा असली पाहिजे. या श्रध्देतूनच सत्याग्रही आपल्या विरोधकावर विश्वास ठेवू शकेल. मानवी स्वभावावरील आंतरिक विश्वास हा सत्याग्रह धर्माचा गाभा आहे. याच श्रध्देतून विरोधकाच्या मताबद्दल सहिष्णुता बाळगून खुल्या मनाने त्याचा विचार करण्याची तयारी सत्याग्रही ठेवू शकतो. तत्वाशी तडजोड न करता तपशिलात तो फेरफार मान्य करु शकतो. आत्म्याच्या सामर्थ्यावर गांधीजींचा एवढा जबरदस्त विश्वास होता की, संख्येपेक्षा गुणवत्तेवरच त्यांनी अधिक भर दिला आहे. सत् आणि असत् यातील युध्द जिंकण्यास एक परिपूर्ण सत्याग्रही समर्थ आहे. अहिंसेने काठोकाठ व्याप्त झालेली एक स्त्री अथवा एक पुरुष सुध्दा चिंतील तसे घडवून आणू शकेल. परंतु असा परिपूर्ण सत्याग्रही सापडणे शक्य नाही. म्हणून सत्याग्रहाच्या संघटित कृतीची आवश्यकता पडते. तिचा सर्वोत्तम उपयोग जनतेला शिक्षित करुन केला जाऊ शकतो. सत्याग्रहासाठी तो करु इच्छिणाऱ्याच्या व्यक्तिमत्त्वाचा संपूर्ण कायापालट व्हावा लागतो.

सत्याग्रहाचा अवलंब वैयक्तिकरित्या तसेच सामूहिकरित्या करता येऊ शकतो. या दोन्ही प्रकारची प्रात्यक्षिके गांधींनी स्वतः दिली होती. दोन्ही सत्याग्रह हे नैतिक पातळीवर करावयाचे असून त्याचे यशापयश हे नैतिक मूल्याच्याच परिमाणाने मोजावे लागते. म्हणूनच सत्याग्रह हा नेहमी सामाजिक हितासाठीच केला जाऊ शकतो.

सत्याग्रहाचा संबंध हृदयपरिवर्तनाशी व स्वतः क्लेश सोसून प्रतिस्पध्याचे मत बदलण्याशी आहे. सत्याग्रहाचा प्रतिपक्षावर होणारा परिणाम अबोध पातळीवरुन होतो. सारे घटनात्मक व सौम्य अहिंसक मार्ग निष्प्रभ झाल्यानंतरच त्याचा अवलंब व्हावा अशी गांधीची अपेक्षा होती. हा विवेक हे अस्त्र वापरणाऱ्यांनी ठेवला पाहिजे. गांधीजींचा सत्याग्रहाचा मार्ग हा संघर्षातही संवाद राखणारा मार्ग आहे. उघडपणे, टोकाला जाऊन संघर्ष करित असतांनाही शासनाशी संवाद राखता येतो आणि म्हणून सत्याग्रह हा परिवर्तनाचा एक सर्जक मार्ग आहे. याचे क्षीण का होईना पण प्रत्यक्ष दर्शन गांधीजींनी हिंदूस्थानात १९१९ ते १९४७ या काळात घडविले.

बाबा आमटेंनी म्हटले की, गांधी माहात्म्य सांगून गांधी सांगता येणार नाहीत आणि उद्याच्या पिढ्यांना त्यांची ओळख पटण्यासाठी कथचित काम्पुटर लागेल, पण काळाच्या भाळावर उमटलेली ही तप्त युगमुद्रा कोणत्याही इतिहासाला पुसून काढता येणार नाही.